# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

**विषय :- प्रभाग समिती क्रमांक ०३ कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टिक पद्धतीने दुरुस्ती करणे.**

प्रभाग समिती क्रमांक ०३ कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टिक पद्धतीने दुरुस्ती करणे. याकामी "रस्ते व पदपथ दुरुस्ती " या मनपा निधीच्या लेखाशिर्ष अंतर्गत एकुण रक्कम रु. ३४,९७,३३३/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन सदर प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे प्रशासकीय मंजुरी करिता सादर करण्यांत आला असुन, सदर प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २६/०७/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रं. :-** ४७२ **दिनांक :-** ६ / ८ /२०२४

प्रभाग समिती क्रमांक ०३ कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टिक पद्धतीने दुरुस्ती करणे. याकामी "रस्ते व पदपथ दुरुस्ती" या मनपा निधीच्या लेखाशिर्ष अंतर्गत रक्कम रु. ३४,९७,३३३/- इतक्या रक्कमेचे प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार वरिल नमुद कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय :- प्रभाग समिती क्र. १ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी रस्ते नादुरुस्त झाले असुन त्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असलेबाबत वाहतुक विभागाचे पत्र प्राप्त झाले आहे. सध्या मोठ्या प्रमाणावर पडत असलेल्या संततधार पावसामुळे प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य डांबरी रस्ते नादुरुस्त झालेले आहेत. लवकरच गणेशोत्सव सण येत आहे. गणेशोत्सव सणांमध्ये गणपती विसर्जण मार्गावर मोठ्या प्रमाणात मिरवणूका जात असतात. रस्त्यांवरील खड्यामुळे गणेश मुर्तीना अपघात होऊन नागरीकांच्या धार्मीक भावना दुखावण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचे रस्ते गणेशोत्सव सणापूर्वी नागरीकांच्या सोईकरिता दुरुस्त करुन रहदारी करिता सुस्थितीत करणे आवश्यक आहे. या कामी स्थानिक नागरीक व पदाधिकारी वारंवार मागणी करितआहेत. मागील वर्षी मास्टीक पध्दतीने रस्ते दुरुस्ती करण्यात आलेली होती व रस्ते आजच्या स्थितीत देखील सुस्थितीत आहे. मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दि.०६/०७/२०२४ रोजी झालेल्या रस्ते सुरक्षा बैठक-२०२४ मध्ये मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी देखील नादुरुस्त रस्त्यांची दुरुस्ती मास्टिक पध्दतीने करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहे. तसेच पावसाळ्यात डांबरीकरणाने रस्ते दुरुस्त केल्यास पावसाच्या पाण्यामुळे रस्ते पुन्हा खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मास्टीक पध्दतीने रस्ते दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने विषयांकीत कामाचे रक्कम रुपये ३४,९५,५००/- (अक्षरी चौतीस लाख पंच्यांनवद हजार पाचशे मात्र ) इतका खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त सो यांनी दि.२६/०७/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र.:-** ४७३ **दिनांक :-** ८/ ८/**२०२४**

प्रभाग समिती क्र. १ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणेकामाचा रक्कम रुपये ३४,९५,५००/- (अक्षरी चौतीस लाख पंच्यांनवद हजार पाचशे मात्र) इतक्या खर्चाचा प्रस्ताव सादर केला असुन शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे याकामी रक्कम रुपये ३४,९५,५००/- (अक्षरी चौतीस लाख पंच्यांनवद हजार पाचशे) मात्र खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**